Epaper

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल

MSME - MH-33 -0714843

दैनिक

सत्याचे प्राईम्स

# जन सम्राट टाईम्स

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

भुसावळमध्ये राजकीय भूकंप; नगराध्यक्षा भंगाळे अपात्र (पान २ वर)



। बुधवार, दि. ६ मे २०२६ । वर्ष १ । अंक ३१ । पाने २।

DIGITAL EDITION

» Selected

### गारपिटीनंतर आता उष्णतेची लाट येणार

नवी दिल्ली: गेल्या काही दिवसांपासून वातावरणात कमालीचा बदल दिसून येत आहे. अनेक ठिकाणी पाऊस आणि गारपिट झाल्याचे पाहिला मिळाले. यामुळे आधीच उकाड्याने झालेल्या नागरिकांना थोड्या प्रमाणात दिलासा मिळाला आहे. असे असताना आता पुन्हा एकदा उष्णतेची लाट येणार असल्याचा अंदाज आहे. तसेच काश्मीर आणि आसपासच्या भागातील सक्रिय पश्चिमी वाऱ्यांमुळे उत्तर भारतातील अनेक भागांमध्ये सोसाट्याचा वारा, मेघगर्जना, धुळीची वादळे, हलका पाऊस आणि गारपीट होण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, दिल्ली-एनसीआरसह उत्तर भारतात ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगाने सोसाट्याचा वाऱ्याचा अंदाज आहे, तर पूर्व उत्तर प्रदेश, मेघगर्जना आणि गारपीट होईल, अशी शक्यता आहे. देशाच्या अनेक भागांसाठी मुसळधार पावसाचा इशाराही देण्यात आला आहे.

## बौद्ध समाजाचे जगावेगळे अभियान; निधी व प्रतिनिधित्वासाठी देशभर मोहीम


# ‘जात सांगा’ अभियानाचा धडाका!

### जनगणनेत बौद्धांसह पूर्वाश्रमीची जात नोंदवण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | अनुसूचित जातीच्या विकासासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात दिला जाणारा निधी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागांमधून उपलब्ध होणारे राजकीय प्रतिनिधीत्व यांमध्ये योग्य वाटा मिळवण्यासाठी देशातील १६ व्या जनगणनेच्या पार्श्वभूमीवर भारतीय बौद्ध महासभा, बौद्धजन पंचायत समिती आणि आंबेडकरी अभ्यासक-विचारवंतांनी ‘जात सांगा’ असे अभिनव अभियान सुरु केले आहे.**

अनुसूचित जातीच्या आरक्षणाचे प्रस्तावित असलेले उपवर्गीकरण आणि विलंबाने होत असलेली जनगणना यांमुळे बौद्ध समाजात प्रतिक्रिया उमटू लागली आहे. १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. बौद्धांमध्ये जाती नाहीत, त्यामुळे जनगणनेत बौद्ध धर्म सांगणार पण पूर्वाश्रीमची जात नमूद करणार नाही, अशी अनेक नवबौद्धांची ताठर भूमिका आहे. यामुळे बौद्ध धर्मियांचा टक्का वाढला तरी अनुसूचित जातीची लोकसंख्या मात्र घटली. परिणामी, लोकसंख्येच्या प्रमाणात मिळणारा निधी आणि स्थानिक




स्वराज्य संस्थांमधील राजकीय प्रतिनिधित्व कमी झाले. सहा महिन्यांपूर्वी राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये या विषयाला तोंड फुटले होते. चेंडू काढताना इमारतीच्या अरुंद जागेत अडकलेल्या मुलाची सुटका; अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे अनर्थ टळला नुकत्याच सुरु झालेल्या जनगणनेमध्ये ही चूक दुरुस्त करण्याचा निर्णय नवबौद्ध समाजाने घेतला आहे. यामध्ये आंबेडकर कुटुंबिय विश्वस्त असलेल्या भारतीय बौद्ध महासभा आणि बौद्धजन पंचायत समितीने पुढाकार घेतला आहे. जागोजागी बैठका घेतल्या जात आहेत. अनेक संघटना व समाजातील अभ्यासक-विचारवंतांनी पत्रके काढली आहेत. जनगणनेमध्ये प्रथम बौद्ध धर्म नोंद करा. बौद्ध धर्म नोंद केल्याने अनुसूचित जातीचे आरक्षण जाणार नाही. हिंदू व शिखांप्रमाणे बौद्धांमधील अनुसूचित जातींना आरक्षणाचे लाभ मिळण्याबाबत १९९० मध्ये कायद्यामध्ये दुरुस्ती केली आहे. बौद्ध धर्म नोंदवल्यानंतर संविधानिक अधिकाराचा लाभ मिळण्यासाठी पूर्वाश्रमीची जातसुद्धा सांगा, त्याचबरोबर बौद्ध साहित्य ज्या भाषेमध्ये आहे ती पाली अधिकची भाषा म्हणून नोंद करा, असे आवाहन केले जात आहे. १ कोटी ३२ लाख अनुसूचित जातीची लोकसंख्या असून त्यामध्ये ६५ लाख ३१ हजार बौद्ध आहेत. हे अभियान राष्ट्रीय पातळीवर राबवण्यात येत आहे. १९५६ चे धर्मांतर आणि पूर्वाश्रीमीची जात नमूद न करणे यामुळे १९६१ पासूनच्या जनगणनांमधील नवबौद्धांच्या लोकसंख्येसंदर्भात संभ्रम निर्माण झालेला आहे.

### या जातीना आवाहन

उत्तरेत चमार, सैनी, मौर्य, खुशवा, गुजरातमध्ये वाल्मिकी व वणकर, कर्नाटकमध्ये वल्लुवन आणि महाराष्ट्रात चर्मकार व मातंग व इतरांनी जनगणनेमध्ये बौद्ध धर्म नोंदवावा, असे आम्ही आवाहन करत आहोत.

– **भीमराव आंबेडकर,** कार्याध्यक्ष, भारतीय बौद्ध महासभा.

### हिंदु अनुसूचित जातीनी बौद्ध नोंदवा

बौद्ध धर्माचरण करणारे पण कागदपत्रावर हिंदू व अनुसूचित जातीचा उल्लेख केलेले लाखो नागरिक आहेत. त्यांनी या जनगणनेमध्ये बौद्ध धर्माबरोबरच पूर्वाश्रीमीची जात नोंदवावी, असे आमचे आवाहन आहे.

– **राजकुमार बडोले,** माजी सामाजिक न्याय मंत्री.


जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज

## बँक संप: सलग ४ दिवस सेवा ठप्प होण्याची शक्यता

### ग्राहकांना व्यवहार पूर्ण करण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | विशेष प्रतिनिधी** : देशातील कोट्यवधी बँक ग्राहकांसाठी चिंतेची बातमी समोर आली असून, मे २०२६ मध्ये बँक कर्मचाऱ्यांच्या विविध संघटनांनी संपाचा इशारा दिला आहे. बँक युनियन्स आणि व्यवस्थापन यांच्यातील चर्चेत एकमत न झाल्याने हा संघर्ष तीव्र झाला असून, सलग चार दिवस बँकिंग सेवा विस्कळीत होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या संभाव्य संपाचा परिणाम देशभरातील प्रमुख बँकांवर होणार असून, विशेषतः STATE BANK OF INDIA (एसबीआय) च्या शाखांमधील कामकाजावर मोठा परिणाम होण्याची भीती आहे. मे महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात हा संप झाल्यास शनिवार-रविवारच्या सुट्ट्यांसह सलग चार दिवस बँका बंद राहू शकतात. आर्थिक व्यवहारांवर मोठा परिणाम या संपामुळे केवळ शाखांमधील व्यवहारच नव्हे, तर धनादेश वटवणे, निधी हस्तांतरण आणि इतर महत्त्वाच्या सेवा ठप्प होऊ शकतात. विशेषतः RTGS आणि NEFT यांसारख्या प्रणालींवर परिणाम होण्याची शक्यता आहे. व्यापारी, उद्योगपती आणि सर्वसामान्य खातेदारांना याचा थेट फटका बसू शकतो.




#### आवश्यक व्यवहार वेळेत पूर्ण करावेत

संपामागील प्रमुख कारणे बँक कर्मचाऱ्यांनी पगारवाढ, रिक्त पदांची भरती, कामाच्या तासांचे योग्य नियोजन आणि सेवा अटी सुधारणा या प्रमुख मागण्यांसाठी संपाची हाक दिली आहे. मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप संघटनांकडून करण्यात येत आहे. ग्राहकांनी आपली महत्त्वाची कामे आधीच पूर्ण करून घ्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. एटीएममधून आवश्यक रोकड आगाऊ काढून ठेवावी चेक क्लिअरन्स किंवा मोठे व्यवहार लांबणीवर टाळावेत संपाच्या काळात नेट बँकिंग, मोबाईल बँकिंग आणि YONO APP सारख्या डिजिटल सेवा सुरू राहतील.

## डोनाल्ड ट्रम्प यांनी केले नरेंद्र मोदींचे अभिनंदन

जन सम्राट टाईम्स

वॉशिंग्टन/नवी दिल्ली | प्रतिनिधी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीतील भारतीय जनता पक्षाच्या ऐतिहासिक आणि निर्णायक विजयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदींचे अभिनंदन केले आहे. व्हाईट हाऊसने या विजयाचे वर्णन 'ऐतिहासिक आणि महत्त्वपूर्ण' असे केले असून, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी मोदींच्या नेतृत्वाचे आणि भारतीय लोकशाहीच्या सामर्थ्याचे कौतुक केले. व्हाईट हाऊसचे प्रवक्ते कुश देसाई यांनी जारी केलेल्या अधिकृत निवेदनात म्हटले आहे की, ट्रम्प यांनी पंतप्रधान मोदींना फोनवरून शुभेच्छा दिल्या आणि भारताला त्यांच्यासारखा नेता लाभणे हे भाग्याचे असल्याचे नमूद केले. व्हाईट हाऊसने या निकालाला एक नव्या युगाची सुरुवात म्हटले आहे. अमेरिकेने या विजयाची दखल घेत भारत-अमेरिका संबंध आगामी काळात अधिक दृढ होतील, असा विश्वास व्यक्त केला आहे. स्वातंत्र्यानंतर प्रथमच पश्चिम बंगालमध्ये भाजपचे सरकार स्थापन होणार असल्याने या निकालाला मोठे धोरणात्मक महत्त्व आहे. यंदाच्या निवडणुकीत ९२ टक्के इतके विक्रमी मतदान झाले होते, जे लोकशाहीवरील जनतेच्या विश्वासाचे प्रतीक मानले जात आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या सेवांवरील जीआरमध्ये गंभीर चूक

### तारखेतील घोळ ; आठवड्यानंतर शुध्दीपत्रक काढत प्रशासनाने केली दुरुस्ती

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | विशेष प्रतिनिधी :** राज्याच्या प्रशासकीय केंद्रस्थानी असलेल्या मंत्रालयातील ‘लालफितीचा’ कारभार पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. यावेळी तर थेट मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या शासकीय निवासस्थानांशी संबंधित शासन निर्णयात (जीआर) गंभीर चूक झाल्याचे उघडकीस आले आहे. अवघ्या आठवडाभरापूर्वी काढलेल्या निर्णयात तारखेचा घोळ झाल्याने प्रशासनाला नंतर शुध्दीपत्रक काढून दुरुस्ती करावी लागली. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या शासकीय निवासस्थानी खानपान सेवा पुरवण्यासाठी कंत्राटदार नियुक्तीबाबत २८ एप्रिल २०२६ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. मात्र या निर्णयातील संदर्भ क्रमांक ८ मध्ये नमूद केलेली तारीख चुकीची असल्याचे समोर आले. “१३ एप्रिल २०२५” अशी नमूद केलेली तारीख प्रत्यक्षात “१३ एप्रिल २०२६” अशी असायला हवी होती. आठवडाभरानंतर उघड चूक सदर जीआर प्रसिद्ध झाल्यानंतर तब्बल सात दिवसांनी ही चूक प्रशासनाच्या लक्षात आली. अखेर ५ मे २०२६ रोजी सामान्य प्रशासन विभागाने शुध्दीपत्रक काढत चुकीची तारीख दुरुस्त केली.



या प्रकारामुळे मंत्रालयातील कामकाजातील निष्काळजीपणा पुन्हा अधोरेखित झाला आहे. व्हीव्हीआयपी सेवांमध्येही त्रुटी? या कंत्राटामध्ये ‘श्री. सुखसागर हॉस्पिटॅलिटी सर्व्हिसेस’ (कोपरखैरणे) आणि ‘मे. छत्रधारी कॅटरर्स’ (मुलुंड) यांसारख्या संस्थांची नावे नमूद करण्यात आली आहेत. मात्र, व्हीव्हीआयपी निवासस्थानांच्या संवेदनशील सेवांमध्येही अशा प्रकारच्या टायपिंग किंवा कॉपी-पेस्ट चुका होत असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. प्रशासकीय तपशील उघड सुधारित शुध्दीपत्रक क्रमांक ‘उपुनि २०२५/प्र.क्र.२५/२०२५/मंआस्था-२’ असा असून, अवर सचिव देविदास सांदुजी भगुरे यांच्या स्वाक्षरीने ते जारी करण्यात आले आहे. संबंधित शुध्दीपत्रक शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावरही उपलब्ध करण्यात आले आहे. मात्र आता मुख्यमंत्री कार्यालयाशी संबंधित महत्त्वाच्या कागदपत्रांमध्येच चुका आढळल्याने मंत्रालयातील कामकाजाच्या शिस्तीवर प्रश्न उपस्थित होत असून, या प्रकाराची गंभीर दखल घेण्याची मागणी होत आहे.

## लैंगिक अत्याचाराच्या आरोपींना पॅरोल देऊ नका : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

जन सम्राट टाईम्स

मुंबई | प्रतिनिधी : पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे ४ वर्षांच्या चिमुरडीवर झालेल्या अत्याचार आणि हत्येच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला असून, या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य प्रशासनाला मोठे निर्देश दिले आहेत. लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यातील आरोपींना यापुढे पॅरोल मंजूर करू नये, असे आदेश फडणवीस यांनी विधी व न्याय विभागाला दिले आहेत. नसरापूर येथील घटनेनंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पीडित कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी आणि गुन्हेगारांवर कठोर वचक बसवण्यासाठी हा निर्णय घेतला आहे. लैंगिक अत्याचारासारख्या गंभीर आणि अमानवीय गुन्ह्यातील आरोपींना पॅरोल मिळाल्यास समाजात चुकीचा संदेश जातो आणि पीडितांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो, ही बाब विचारात घेऊन हे निर्देश देण्यात आले आहेत. पॅरोलवर बंदी: लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यात शिक्षा भोगत असलेल्या किंवा आरोपी असलेल्या व्यक्तींना पॅरोलची सवलत देऊ नये, असे निर्देश देण्यात आले आहेत. अंमलबजावणी: विधी व न्याय विभागाने या संदर्भात तातडीने कार्यवाही करून कायद्याची कडक अंमलबजावणी करावी, अशा सूचना फडणवीस यांनी दिल्या आहेत.

## तामिळनाडूत राजकीय उलथापालथ; एम. के. स्टॅलिन यांचा मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा

जन सम्राट टाईम्स

**चेन्नई | प्रतिनिधी:** तामिळनाडूच्या राजकारणात मोठी घडामोड घडली असून, विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर द्रविड मुन्नेत्र कळघम (डीएमके)चे प्रमुख एम. के. स्टॅलिन यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला आहे. मंगळवारी त्यांनी राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ अर्लेकर यांच्याकडे आपला राजीनामा सादर केला. राजभवनातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, राजीनामा पत्र औपचारिकरित्या राज्यपालांच्या कार्यालयात पाठवण्यात आले असून, त्यावर अंतिम निर्णय व अधिकृत घोषणा लवकरच अपेक्षित आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर राज्यात मोठे राजकीय स्थित्यंतर घडले आहे. द्रविड मुन्नेत्र कळघम पक्षाला केवळ ५९ जागांवर समाधान मानावे लागले, जे त्यांच्या दृष्टीने मोठा धक्का मानला जात आहे दुसरीकडे, अभिनेते-राजकारणी विजय यांच्या नेतृत्वाखालील तामिळगा वेत्री कळघम (टीव्हीके) पक्षाने २३४ सदस्यीय विधानसभेत १०७ जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष म्हणून उदय घेतला आहे. बहुमतासाठी आवश्यक असलेल्या आकड्यापेक्षा टीव्हीके केवळ १० जागांनी कमी आहे. या निकालामुळे तामिळनाडूमध्ये सत्ता स्थापनेबाबत विविध राजकीय समीकरणांची चर्चा सुरू झाली आहे. संभाव्य आघाड्या, अपक्षांचा पाठिंबा किंवा इतर राजकीय पर्यायांवर सध्या विचारमंथन सुरू असल्याचे सूत्रांनी सांगितले. स्टॅलिन यांच्या राजीनाम्यामुळे राज्यात नव्या राजकीय अध्यायाची सुरुवात होण्याची चिन्हे दिसत आहेत.

जन सम्राट टाईम्स | अँकर न्यूज


## "आम्ही हरलो नाही, आम्हाला षडयंत्राने हरवण्यात आले!"

### पश्चिम बंगाल निवडणूक निकालानंतर ममताचा भाजप आणि निवडणूक आयोगावर आरोपांचा भडिमार

जन सम्राट टाईम्स

**कोलकाता । प्रतिनिधी :** पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या ऐतिहासिक आणि धक्कादायक निकालानंतर तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी मंगळवारी, ५ मे रोजी आपली पहिली सविस्तर प्रतिक्रिया दिली. कोलकाता येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना त्यांनी भाजप आणि निवडणूक आयोगावर संगनमताने लोकशाहीची हत्या केल्याचा खळबळजनक आरोप केला. "आम्ही ही निवडणूक हरलो नाही, तर आम्हाला षडयंत्र रचून हरवण्यात आले आहे," असे ठाम प्रतिपादन त्यांनी यावेळी केले. या विधानसभा निवडणुकीत भाजपने स्पष्ट बहुमत मिळवत २९४ पैकी २०६ जागांवर विजय मिळवला आहे, तर तृणमूल काँग्रेसला केवळ ८० जागांवर समाधान मानावे लागले आहे. खुद्द ममता बॅनर्जी यांना भवानीपूर मतदारसंघातून पराभवाचा सामना करावा लागला. या निकालानंतर बंगालच्या राजकारणात मोठा सत्तापालट झाला असून, भाजप पहिल्यांदाच राज्यात सत्तेवर येत आहे. भाजपच्या मतांची टक्केवारी ४५.८४% राहिली आहे, तर टीएमसीची ४०.८०% आहे. मतांमधील अल्प फरक असूनही जागांच्या संख्येत मोठी तफावत दिसून आली आहे. आनंदबाजार पत्रिका आणि इतर स्थानिक बंगाली माध्यमांनी याला बंगालमधील एका युगाचा अंत आणि नवीन राजकीय पर्वाची सुरुवात म्हटले आहे.

१. निवडणूक आयोगावर 'बेटिंग'चा आरोप: ममता बॅनर्जी यांनी निवडणूक आयोग आणि भाजप यांच्यात 'मॅच फिक्सिंग' झाल्याचा आरोप केला. त्यांनी म्हटले की, "निवडणुकीच्या दोन दिवस आधी आमच्या कार्यकर्त्यांची धरपकड करण्यात आली. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या करून भाजपच्या सोयीचे अधिकारी नेमण्यात आले. ही निवडणूक नसून भाजप आणि निवडणूक आयोगामधील 'बेटिंग' होती." २. ईव्हीएम मधील तफावत: मतदानानंतर ईव्हीएम मशीन ८० ते ९५ टक्के चार्ज कशी राहू शकतात? असा तांत्रिक प्रश्न त्यांनी उपस्थित केला. "निवडणूक प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर फेरफार करण्यात आला असून ईव्हीएमच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे," असे त्या म्हणाल्या. ३. मतदार यादीतील फेरफार: भाजपने निवडणूक आयोगाच्या मदतीने मतदार यादीतून सुमारे ९० लाख नावे वगळल्याचा गंभीर आरोप ममता यांनी केला. या विरोधात न्यायालयात दाद मागितल्यावर ३२ लाख नावे परत समाविष्ट करण्यात आली,.




#### रस्त्यावर उतरून लोकांसाठी लढणार

मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देण्याच्या प्रश्नावर त्यांनी स्पष्ट केले की, जनतेने आम्हाला कौल दिला होता, पण षडयंत्राने तो हिरावला गेला आहे. "मी आता मुक्त आहे, मी जनतेच्या सेवेसाठी माझे संपूर्ण आयुष्य दिले आहे आणि यापुढेही रस्त्यावर उतरून लोकांसाठी काम करत राहीन," असे म्हणत त्यांनी आक्रमक संघर्षाचे संकेत दिले. ममता बॅनर्जींच्या या भाषणामुळे बंगालमध्ये निकालानंतरही राजकीय वातावरण तापलेले असून, ईव्हीएम आणि निवडणूक प्रक्रियेवरून पुन्हा एकदा राष्ट्रीय स्तरावर वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.

## डॉ. संग्राम पाटील यांना हायकोर्टातून दिलासा!

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:** पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप नेत्यांविरोधात समाजमाध्यमांवरून आक्षेपार्ह मजकूर प्रसिद्ध केल्याच्या कथित आरोपावरून भारतात अडकून पडलेले इंग्लंडस्थित युट्यूबर आणि डॉक्टर संग्राम पाटील यांचा इंग्लंडला परतण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. महाराष्ट्र सरकारने मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयात डॉ. पाटील यांनी दिलेले हमीपत्र स्वीकारत असल्याचे स्पष्ट केले, ज्यामुळे त्यांना इंग्लंडला जाण्यासाठी हिरवा कंदील मिळाला आहे. डॉ. पाटील यांच्या विरोधात 'लुकआउट सर्क्युलर' (एलओसी) बजावण्यात आल्यामुळे ते गेल्या १९ जानेवारीपासून भारतातच अडकून पडले होते. डॉ. संग्राम पाटील हे १० जानेवारी रोजी लंडनहून त्यांच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी भारतात आले होते, मात्र १९ जानेवारीला लंडनला परत जात असताना त्यांना मुंबई विमानतळावर रोखण्यात आले होते. या कारवाईला आव्हान देत त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. प्रदीर्घ काळ भारतात अडकून पडल्यामुळे इंग्लंडच्या 'नॅशनल हेल्थ सर्व्हिसेस' (एनएचएस) मधील त्यांची नोकरी धोक्यात आली होती आणि त्यांच्या रुग्णांचेही हाल होत होते, अशी व्यथा त्यांच्या वकिलांनी न्यायालयात मांडली होती. न्यायमूर्ती अश्विन भोबे यांच्या एकलपीठानेही एका व्यक्तीला विनाकारण एवढा काळ भारतात अडवून ठेवण्याबाबत आक्षेप नोंदवला होता. डॉ. पाटील परदेशात गेल्यास परत येण्याची शाश्वती नसल्याचा आणि त्यांचा तपास अद्याप सुरू असल्याचा युक्तिवाद सुरुवातीला राज्य सरकारने उच्च न्यायालयात केला होता.



Selected

## बोधगयात वियतनामचे राष्ट्रपती तो लाम; महाबोधी मंदिरात पूजा

**गया | प्रतिनिधी :** भारत दौऱ्यावर आलेले वियतनामचे राष्ट्रपती तो लाम मंगळवारी बिहारमधील बोधगया येथे दाखल झाले. गया आंतरराष्ट्रीय विमानतळावर त्यांचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी, राज्यपाल सैयद अता हसनैन तसेच विधानसभा अध्यक्ष डॉ. प्रेम कुमार यांच्या हस्ते उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते. महाबोधी मंदिरात आध्यात्मिक क्षण बोधगयात पोहोचताच राष्ट्रपती तो लाम यांनी जागतिक वारसा स्थळ असलेल्या महाबोधी मंदिर येथे विशेष पूजा-अर्चना केली. त्यांनी पवित्र बोधिवृक्षाखाली ध्यान करत अध्यात्मिक अनुभूती घेतली. या भेटीमुळे भारत आणि वियतनाममधील सांस्कृतिक व बौद्ध वारशाचे नाते अधिक दृढ झाल्याचे मानले जात आहे. वियतनामी मठालाही भेट दिवसभराच्या कार्यक्रमादरम्यान त्यांनी बोधगयातील वियतनामी मठालाही भेट दिली. येथे धार्मिक परंपरा आणि सांस्कृतिक उपक्रमांचा आढावा घेत त्यांनी समाधान व्यक्त केले. राष्ट्रपतींच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर बोधगयात कडेकोट सुरक्षा व्यवस्था करण्यात आली होती. महाबोधी मंदिर परिसरात विशेष बंदोबस्त ठेवण्यात आला होता, तर शहरातील काही मार्गांवर वाहतूक वळवण्यात आली होती.

# उत्तर महाराष्ट्रात फिरते नेत्रालय जनसेवेत दाखल

## बिलखेडा-आसोदा शिबिरांना उत्स्फूर्त प्रतिसाद; १३४ रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड

जन सम्राट टाईम्स

**पाळधी / जळगाव प्रतिनिधी:** फिरते नेत्रालय गावागावातील गरिबांच्या दारात आरोग्य सेवा पोहोचवत आहे. जेष्ठ नागरिक असोत किंवा सर्वसामान्य, त्यांच्या कोणत्याही अडचणींसाठी मी सदैव आपल्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण भागात "गावातच उपचार" ही संकल्पना प्रत्यक्ष उतरली असून अत्याधुनिक फिरते नेत्रालय आता जनतेच्या सेवेत दाखल झाले आहे. जळगाव ग्रामीण मतदार संघात जीपीएस मित्रपरिवाराने मोतीबिंदू मुक्त करण्याच्या दिशेने उचललेले हे पाऊस आरोग्यसेवा संवेदनाने सामाजिक बांधिलकीचा जिवंत आदर्श ठरत असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. धरणगाव तालुक्यातील बिलखेडा तसेच जळगाव तालुक्यातील आसोदा येथे जीपीएस मित्र परिवारतर्फे आयोजित मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरांना ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. बिलखेडा येथे पालकमंत्री गुलाबराव पाटील, युवा नेते प्रतापराव पाटील व पंचायत समिती सभापती मुकुंदराव नन्नवरे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिर पार पडले. या शिबिरांमध्ये बिलखेडा येथे 360 तर आसोदा येथे 210 नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यापैकी बिलखेडा येथील 74 व आसोदा येथील 60 असे एकूण 134 रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवडले गेले. यापैकी 90 पेक्षा अधिक रुग्णांना तात्काळ



पनवेल येथे उपचारासाठी रवाना करण्यात आले. तसेच मोतीबिंदू नसलेल्या अनेक नागरिकांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे, हे अत्याधुनिक फिरते नेत्रालय उत्तर महाराष्ट्रात प्रथमच जीपीएस ग्रुपने सुरू केले असून, ग्रामीण भागातील आरोग्यसेवेत ही एक महत्त्वपूर्ण आणि दूरदृष्टीची भर ठरली आहे. दरम्यान, जीपीएस मित्रपरिवारतर्फे पुढील शिबिरांचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. 6 मे रोजी ममुराबाद, नांद्रा, खापरखेडा, धामणगाव, तुरखेडा, आवार, 7 मे रोजी जळके, विटनेर, वराळ, सुभाषवाडी, लोणवाडी, वसंतवाडी, तर 10 मे रोजी सोनवद बुद्रुक व सोनवद खुर्द येथे सकाळी 8 ते 12 या वेळेत तपासणी, शस्त्रक्रिया निवड व चष्मे वाटप शिबिरे होणार आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन भदाणे सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन दीपक भदाणे व पुरुषोत्तम भदाणे यांनी मानले. यांची होती विशेष उपस्थिती आसोदा येथे सामाजिक कार्यकर्ते तुषार महाजन, गिरीश भोळे, किशोर चौधरी, अजय महाजन, उमेश पाटील, संजोग कोळी, अनिल कोळी, जीवन सोनवणे, शरद नारखेडे, दिपक माळी, लखन जोहरे, धीरज येवले, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. बिलखेडा येथे भदाणे गुरुजी, नवल भदाणे, देवसिंग राजपूत, उपसरपंच दिलीप भदाणे, महेंद्र चव्हाण, जयेश भामरे, राहुल भामरे, नंदू बदाने, पप्पू बाविस्कर, देविदास बडगुजर तसेच पोलीस पाटील संघटनेचे तालुका अध्यक्ष किशोर भदाणे, गोपाल भदाणे, गणेश भदाणे आदी मान्यवर उपस्थित होते. दोन्ही गावांतील तरुणांनी मोठ्या उत्साहाने सहकार्य करत सहभाग नोंदवला. ग्रामस्थांनी पालकमंत्री गुलाबराव पाटील, प्रतापराव पाटील व जीपीएस मित्रपरिवाराचे मनापासून आभार व्यक्त केले.

### यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिर पार पडले

जळगाव ग्रामीण मतदार संघात जीपीएस मित्रपरिवाराने मोतीबिंदू मुक्त करण्याच्या दिशेने उचललेले हे पाऊस आरोग्यसेवा संवेदनाने सामाजिक बांधिलकीचा जिवंत आदर्श ठरत असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी केले. धरणगाव तालुक्यातील बिलखेडा तसेच जळगाव तालुक्यातील आसोदा येथे जीपीएस मित्र परिवारतर्फे आयोजित मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिरांना ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. बिलखेडा येथे पालकमंत्री गुलाबराव पाटील, युवा नेते प्रतापराव पाटील व पंचायत समिती सभापती मुकुंदराव नन्नवरे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिबिर पार पडले.

# मोदी पर्वात भाजपची ऐतिहासिक झेप; देशभरात आमदारसंख्या ७७३ वरून थेट १,८०६!

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षाने (भाजप) राज्यांच्या विधानसभांमध्ये अभूतपूर्व वाढ नोंदवत भारतीय राजकारणात नवा इतिहास रचला आहे. गेल्या दशकात पक्षाच्या आमदारसंख्येत झालेली झपाट्याने वाढ ही 'मोदी पर्वा'ची ठळक ओळख ठरत आहे. सप्टेंबर २०१३ मध्ये देशभरात भाजपचे केवळ ७७३ आमदार होते, तर मे २०२६ पर्यंत हा आकडा तब्बल १,८०६ वर पोहोचला आहे. म्हणजेच अवघ्या १३ वर्षांत पक्षाने १,००० हून अधिक आमदारांची भर घालत आपला राजकीय विस्तार अभूतपूर्व पातळीवर नेला आहे. भाजपची ही घोडदौड केवळ आकड्यांपुरती मर्यादित नसून देशाच्या राजकीय नकाशावर पक्षाने निर्माण केलेल्या व्यापक प्रभावाचे द्योतक मानली जात आहे. राष्ट्रीय राजकारणात आधीच प्रभावी स्थान मिळवलेल्या भाजपने राज्यांच्या स्तरावरही आपले वर्चस्व मजबूत करत 'वन नेशन, वन पॉलिटिकल फोर्स'ची छाप निर्माण केली आहे. संघटनशक्ती आणि रणनीतीचा कमाल प्रभाव भाजपच्या या यशामागे तळागाळातील भक्कम संघटनात्मक बांधणी हा सर्वात मोठा घटक मानला जातो. बूथस्तरापर्यंत पोहोचलेली कार्यकर्त्यांची फौज, डिजिटल आणि डेटा-आधारित निवडणूक



व्यवस्थापन, तसेच सूक्ष्म पातळीवरील नियोजन यामुळे पक्षाने प्रत्येक निवडणुकीत आघाडी घेतली. यासोबतच पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली राबवण्यात आलेली आक्रमक आणि प्रभावी प्रचार रणनीतीही निर्णायक ठरली. पारंपरिक बालेकिल्ल्यांपासून नव्या राज्यांत विस्तार उत्तर प्रदेश आणि गुजरातसारख्या पारंपरिक बालेकिल्ल्यांमध्ये भाजपने आपले वर्चस्व अधिक मजबूत केले आहे.

त्याचबरोबर पश्चिम बंगालसारख्या राजकीयदृष्ट्या आव्हानात्मक राज्यांमध्येही पक्षाने मोठी मुसंडी मारली आहे. पूर्वोत्तर राज्यांमध्येही भाजपने उल्लेखनीय यश मिळवत आपली उपस्थिती वाढवली आहे. या विस्तारामुळे भाजप आता देशातील बहुसंख्य राज्यांमध्ये निर्णायक राजकीय शक्ती म्हणून उदयास आला आहे.

राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल भाजपच्या वाढत्या संख्याबळामुळे देशातील राजकीय समीकरणांमध्ये मोठे बदल झाले आहेत. प्रादेशिक पक्षांच्या प्रभावाला आव्हान देत भाजपने राष्ट्रीय स्तरावर एक मजबूत पर्याय निर्माण केला आहे. अनेक राज्यांमध्ये सत्तांतर घडवून आणण्यात आणि स्थिर सरकार देण्यात पक्ष यशस्वी ठरला आहे. 'मोदी पर्व'ची ओळख अधिक ठळक राजकीय विश्लेषकांच्या मते, भाजपच्या आमदारसंख्येत झालेली ही विक्रमी वाढ म्हणजे 'मोदी पर्वा'ची ठोस ओळख आहे. विकासाचा मुद्दा, मजबूत नेतृत्व, राष्ट्रीय सुरक्षा, आणि प्रभावी संवादशैली यामुळे मतदारांमध्ये पक्षाविषयी विश्वास वाढला आहे.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स | ब्रेक न्यूज | ज

## एरंडोलमध्ये जनगणना २०२७ 'स्व-गणना' प्रक्रियेला उत्साहात प्रारंभ

### नागरिकांना डिजिटल सहभागाचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

**एरंडोल | प्रतिनिधी : :** महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत एरंडोल नगरपरिषद हद्दीत जनगणना २०२७ अंतर्गत 'स्व-गणना' (SELF ENUMERATION) प्रक्रियेला उत्साहपूर्ण वातावरणात सुरुवात झाली. या उपक्रमाचा शुभारंभ नगराध्यक्ष डॉ. नरेंद्र ठाकूर यांनी स्वतःच्या कुटुंबाची माहिती भरून केला. "प्रथम नागरिक म्हणून कर्तव्य पार पाडणे ही आपली जबाबदारी आहे," असा संदेश देत त्यांनी नागरिकांसमोर आदर्श निर्माण केला. या प्रसंगी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अमोल बागुल, एस. आर. ठाकूर, शरद राजपूत, हितेश जोगी आणि वैभव पाटील उपस्थित होते. 'स्व-गणना' म्हणजे काय? जनगणना ही देशातील प्रत्येक नागरिक, कुटुंब आणि घरांची माहिती शासनाकडे नोंदविण्याची महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. यामध्ये लोकसंख्या, शिक्षण, रोजगार, निवास व्यवस्था, पाणी, वीज तसेच सामाजिक-आर्थिक स्थितीची माहिती संकलित केली जाते. यंदा प्रथमच डिजिटल माध्यमातून 'स्व-गणना' प्रणाली लागू करण्यात आली असून नागरिकांना मोबाईल, संगणक किंवा ऑनलाइन पोर्टलद्वारे स्वतःची माहिती भरता येणार आहे. डिजिटल पद्धतीचे फायदे




### जनजागृती मोहिमांची गरज

शासनाला अचूक डेटा उपलब्ध झाल्यामुळे शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, रस्ते व रोजगार यांसारख्या विकास योजनांचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येणार आहे. आव्हानांची जाणीव तथापि, ग्रामीण भागात किंवा ज्येष्ठ नागरिकांमध्ये डिजिटल साक्षरतेचा अभाव असल्याने काहींना ही प्रक्रिया कठीण जाऊ शकते. इंटरनेट सुविधा नसलेल्या भागांमध्येही अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांना मार्गदर्शन करण्यासाठी मदत केंद्रे आणि जनजागृती मोहिमांची गरज अधोरेखित होत आहे.

या नव्या प्रणालीमुळे नागरिकांना स्वतःची माहिती अचूकपणे नोंदवता येणार आहे. प्रक्रिया जलद होणार असून वेळेची बचत होईल. माहितीतील त्रुटी कमी होतील आणि कागदपत्रांचा वापरही घटेल.

## शाह महाविद्यालयात सांस्कृतिक सोहळा

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम. पी. शाह महिला महाविद्यालय येथे महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिनानिमित्त "महाराष्ट्राची संस्कृती" या विषयावर भव्य सांस्कृतिक उपक्रम उत्साहात पार पडला. मराठी विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि विश्वभान प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सकाळी महाविद्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर राष्ट्रगीत आणि राज्यगीत सादर करत उपस्थितांनी राष्ट्रध्वजाला सलामी देत महाराष्ट्र दिनाचे महत्त्व अधोरेखित केले. सांस्कृतिक



सादरीकरणांनी रंगत वाढली कार्यक्रमाची सुरुवात प्रा. माधवी पवार यांच्या गणेश वंदनेने झाली. त्यानंतर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घडवणारी विविध सादरीकरणे झाली. मायभूमी गीत, 'वेडात मराठे वीर दौडले सात' आणि 'जयोस्तुते' ही गीते स्वर संस्कार संगीत विद्यालयाच्या संचालिका सुरेखा भुजबळ यांनी सादर केली. 'धरीला पंढरीचा चोर' हे सादरीकरणही विशेष ठरले. वर्षा घोलप आणि सर्वज्ञ घोलप यांच्या नाटुकलीने प्रेक्षकांची मने जिंकली, तर समृद्धी सोळंके हिच्या वासुदेव वेशभूषेतील अभिनयाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कोळी नृत्य, शेतकरी नृत्य आणि लेझीम या लोककलांनी वातावरण भारावून टाकले. दिक्षा घनावटे हिच्या 'गौरव महाराष्ट्राचा' या सादरीकरणाने कार्यक्रमाला विशेष उंची मिळाली.

## बुद्ध पौर्णिमेनिमित्त युवाशक्ती संघटनेचा उपक्रम; शरबत व शालेय साहित्य वाटप

जन सम्राट टाईम्स

**पुणे | प्रतिनिधी :** तथागत गौतम बुद्ध यांच्या बुद्ध पौर्णिमेनिमित्त ताडीवाला रोड, लुंबिनी नगर येथे युवाशक्ती संघटनेच्या वतीने शरबत वाटप व शालेय साहित्य वितरणाचा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकीचे प्रभावी दर्शन घडले. कै. सोनूभाऊ अडसूळ यांच्या स्मरणार्थ आयोजित या कार्यक्रमात परिसरातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यामध्ये वह्या, पुस्तके, पेन, पेन्सिल तसेच




कंपासपेटी यांचा समावेश होता. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) पुणे शहर उपाध्यक्ष आनंद सवाणे, भीम छावा संघटनेचे संस्थापक शामभाऊ गायकवाड, सोनूभाऊ निकाळजे आणि दशरथ शेट्टी यांच्या हस्ते साहित्य वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते प्रतिक कांबळे यांनी केले होते. यावेळी गणेश माने, सुनील जंगले, अलताफ शेख, पांडुरंग बनसोडे, निखिल जगताप, सकलेन शेख यांसह स्थानिक नागरिक उपस्थित होते. या उपक्रमामुळे बुद्ध पौर्णिमेचे औचित्य साधत समाजात सेवा, सहकार्य आणि शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित झाले.

## पत्रकारिता प्रशिक्षण कार्यशाळेची घोषणा; इच्छुकांसाठी सुवर्णसंधी!

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** जय महाराष्ट्र पत्रकार, वृत्तपत्र लेखक कवी महासंघ आणि 'झुंजार लेखणी' या पुरोगामी विचारांच्या संघटनेच्या संयुक्त विद्यमाने, तसेच 'मूकनायक' उपक्रमांतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त पत्रकारिता प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. इच्छुकांसाठी ही कार्यशाळा पत्रकारितेचे सखोल आणि सर्वंकष ज्ञान देणारी ठरणार आहे. या कार्यशाळेत ज्येष्ठ पत्रकार व सामाजिक-राजकीय विश्लेषक हेमंत देसाई, वरिष्ठ पत्रकार प्रतिमा जोशी, प्रा. हेमंत सामंत, दिवाकर शेजवळ, अनिल गलगली, विलास बडे आणि सुरज भोईर हे मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्या अनुभवातून नवोदितांना पत्रकारितेचे बारकावे शिकण्याची संधी मिळणार आहे. अभ्यासक्रमात काय असेल? या प्रमाणपत्र अभ्यासक्रमात पत्रकारिता क्षेत्रातील विविध महत्त्वाचे विषय समाविष्ट करण्यात आले आहेत. या उपक्रमाच्या




यशस्वी आयोजनासाठी संतोष आंबेकर, मोहन जाधव, दिलीप नारद, डॉ. प्रभाकर कांबळे, गुरुदत्त वाकदेकर, मनीषा मांढरे यांच्यासह अनेक कार्यकर्ते सक्रिय सहभाग घेत आहेत. तसेच मैत्री संस्था, सामाजिक कार्यकर्ता समन्वय समिती, माणुसकी फाउंडेशन आणि मराठी साहित्य व कला सेवा यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. नोंदणीसाठी आवाहन कार्यशाळेसाठी प्रवेश मर्यादित ठेवण्यात आला असून इच्छुकांनी लवकरात लवकर नोंदणी करण्याचे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ९९६९६ ८६०१४ या क्रमांकावर संपर्क साधावा. ही कार्यशाळा पत्रकारिता क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्या तरुणांसाठी एक महत्त्वाची पायरी ठरणार आहे.

## संविधान अमृत महोत्सव निमित्त राज्यस्तरीय गौरव पुरस्कार सोहळा

### पत्रकारिता प्रशिक्षण कार्यशाळेचीही घोषणा



जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** भारतीय संविधानाच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आशादीप महिला आधार मंचच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय गौरव पुरस्कार सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. लेक लाडकी अभियान, महाराष्ट्र राज्य यांच्या संलग्नतेत आणि ॲड. वर्षाताई देशपांडे यांच्या प्रेरणेने आयोजित या कार्यक्रमात समाजसेवेसाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांचा गौरव करण्यात आला. रविवार, ३ मे २०२६ रोजी सायंकाळी आयोजित या सोहळ्यात "डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतीय संविधान अमृत महोत्सव गौरव पुरस्कार २०२६" प्रदान करण्यात आला. कार्यक्रमास मुंबईच्या माजी महापौर ॲड. निर्मला सामंत प्रभावळकर, लोकशाहीर नंदेश विठ्ठल उमप, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पणतू प्रा. अक्षय आंबेडकर तसेच आशादीप महिला आधार मंचच्या अध्यक्षा आशा संतोष भोईर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमादरम्यान समाजातील विविध क्षेत्रांत कार्यरत व्यक्तींना सन्मानित करण्यात आले. उपस्थितांनी सामाजिक बांधिलकी जपत "हुंडा न घेण्याची आणि न देण्याची" सार्वजनिक शपथ घेतली. या उपक्रमामुळे समाजात सकारात्मक संदेश पसरवण्यास मोठी मदत होणार असल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. सोहळ्याचे संयोजन मंगला गुरव यांनी केले. निमंत्रक म्हणून जया गाई, डॉ. मोनिका जगताप, सूरज भोईर, सुरेश साळवी, विजय भोसले, प्रभाकर कांबळे, तानाजी फणसे, संगीता मुख, गौतम खंडागळे, विजय वाघेला, जितेंद्र जोशी आणि ॲड. सोपान बुडबाडकर यांनी जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली. यावेळी लवकरच पत्रकारिता प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात येणार असल्याची माहितीही देण्यात आली. या उपक्रमाला मैत्री संस्था, सामाजिक कार्यकर्ता समन्वय समिती, जय महाराष्ट्र पत्रकार संघ, माणुसकी फाउंडेशन आणि मराठी साहित्य व कला सेवा यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कवी व पत्रकार गुरुदत्त वाकदेकर, लेखक मोहन जाधव, योगशिक्षक संतोष खरटमोल, विकास कदम, संतोष तांबे, विनायक जवळेकर, विजय केदासे आणि अभिनेत्री निशा जाधव यांनी मोलाचे योगदान दिले. समाजजागृती आणि संविधान मूल्यांचा प्रसार करण्याच्या उद्देशाने आयोजित हा सोहळा प्रेरणादायी आणि परिणामकारक ठरला.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स | अँकर न्यूज | ज

# भुसावळमध्ये राजकीय भूकंप; नगराध्यक्षा गायत्री भंगाळे अपात्र

## जात प्रमाणपत्र अवैध ठरल्याने शासनाचा निर्णय; सत्तेचा संपूर्ण समीकरण बदलण्याची चिन्हे

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ | प्रतिनिधी :** भुसावळच्या राजकारणात मोठा धक्का देणारी घटना समोर आली असून, नगराध्यक्षा गायत्री गौर-भंगाळे यांना राज्य शासनाने थेट अपात्र ठरवले आहे. या निर्णयामुळे शहरासह संपूर्ण जळगाव जिल्ह्यात खळबळ उडाली असून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. भुसावळ नगराध्यक्षपद हे अनुसूचित जाती महिला प्रवर्गासाठी राखीव असताना राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) तर्फे गायत्री भंगाळे यांनी निवडणूक जिंकली होती. त्यांनी प्रतिस्पर्धी रजनीताई सावकारे यांचा पराभव करत सत्तेवर कब्जा मिळवला होता.

मात्र, निवडणुकीनंतर त्यांच्या जात प्रमाणपत्रावर आक्षेप घेण्यात आला आणि त्यातूनच हा वाद निर्माण झाला. चौकशीत धक्कादायक निष्कर्ष तक्रारीनंतर प्रकरण जात पडताळणी समितीकडे गेले. सखोल चौकशीनंतर समितीने संबंधित जात प्रमाणपत्र अवैध ठरवले. २३ एप्रिल रोजी हा निर्णय स्पष्ट करण्यात आला



असून त्यानंतर शासनाने तात्काळ कारवाई करत भंगाळे यांना अपात्र घोषित केले. हा आदेश राज्य शासनाच्या सहसचिव विद्या हम्पय्या यांच्या स्वाक्षरीने जारी करण्यात आला आहे. विशेष म्हणजे ही अपात्रता "भूतलक्षी प्रभावाने" लागू करण्यात आली असून त्यांच्या संपूर्ण कार्यकाळावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भुसावळच्या राजकारणात मोठा धक्का देणारी घटना समोर आली असून, नगराध्यक्षा गायत्री गौर-भंगाळे यांना राज्य शासनाने थेट अपात्र ठरवले आहे. सत्तेचे समीकरण बदलण्याची शक्यता या निर्णयामुळे भुसावळ नगरपालिकेतील सत्तेचे समीकरण पूर्णपणे बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली असून पुढील काही दिवसांत मोठ्या राजकीय घडामोडी घडण्याची चिन्हे आहेत.

### "एक प्रमाणपत्र आणि सत्तेचा डाव उलथला"

एका जात प्रमाणपत्राच्या वादामुळे संपूर्ण सत्तेचा डाव उलथल्याचे चित्र समोर आले आहे. भुसावळच्या राजकारणात आता पुढे काय होणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### नागरिकांकडून सवालांची सरबत्ती

**या प्रकरणामुळे नागरिकांमध्ये अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत**

**निवडणुकीपूर्वीच जात पडताळणी का झाली नाही?**

**प्रशासनाने एवढा गंभीर मुद्दा दुर्लक्षित कसा केला?**

**आता नव्या नेतृत्वाची निवड कशी आणि कधी होणार?**